न्यायदानाच्या कामात विलंब किंवा अडथळे उत्पन्न करण्याची वृत्ती मला कोल्हापुरात आढळली नाही. न्यायाधीशाबद्दल अगत्य आणि आदर हे कोल्हापूर येथील वकिलांचे वैशिष्टच होते. मुंबई हायकोर्टाचे त्यावेळचे सरन्यायाधीश, न्यायमूर्ती छगला यांनी कोल्हापूरला भेट दिली त्यावेळी कोल्हापूर येथील वकिलानी त्यांचे ज्या अगत्याने आणि आदराने स्वागत केले, ते छगलासाहेबानासुद्धां अविस्मरणीय वाटले असेल.

वकिलांच्या सहकारामुळे कोल्हापुरातील माझा काळ फार सुखाचा गेला. त्या काळाची आठवण झाली म्हणजे अनेक वकिलांची, सहकारी न्यायाधिशांची आणि श्री. एम्. एस्. पाटील यांच्यासारख्या चतुर आणि विशाल दृष्टीच्या डिस्ट्रिक्ट जज्जांची मला जशी आठवण होते, तशीच एका साध्या कर्मचाऱ्याची सुद्धां आठवण होते – त्याचे नांव बाळू !

बाळू हा कोल्हापूर येथील वकिलांच्या लायब्ररीतील अेक साधा कर्मचारी होता–ग्रंथपाल नव्हता ! पण लायब्ररीतून कोणतेही पुस्तक मागितले म्हणजे बाळू ते तात्काळ आणून देत असे. ते विविक्षित पुस्तक कोणी नेले असेल किंवा उपलब्ध नसेल तर त्याची गरज भागेल असे दुसरे पुस्तक ( equivalent ) आणून देत असे. वकिलाला किंवा न्यायाधीशाला अवश्य ते पुस्तक आपण पुरविले या अेकमेव समाधानासाठी त्याची सर्व खटपट चालू होती – आणि तीसुद्धां न्यायदानाला खरोखरच मदतच करीत असे !

**– वसन्त शांताराम देसाई**

( श्री. वसंतरावानी कै. बाळू मर्दाने याचा उल्लेख आवर्जून केला आहे तो अगदी यथायोग्यच आहे. इतका कार्यक्षम, कष्टाळू आणि सर्वांना प्रिय असा शिपाई कोल्हापुरच्या ग्रंथालयाच्या इतिहासात दुसरा कोणी क्वचित्च झाला असेल. बाळूचा फोटो वकिलांच्या ग्रुपमध्ये एकदोन ठिकाणी आला आहे.

ओघानेच लायब्ररीयन् श्री. एस्. के. मिराशी यांच्या निरलस, कार्यक्षम व दीर्घ ( सुमारे तीस वर्षे ) सेवेचा गौरवपूर्वक उल्लेख करणे जरूर आहे. त्यानी या स्मरणिकेकरिता एक दुर्मिळ फोटो व बरीच माहिती पुरवली. )

**–– संपादक**

● ● ●

# ७

(**श्री. वसंतराव देशमुख**, पुण्याचे एक आघाडीवरील अॅडव्होकेट व सार्वजनिक कार्यकर्ते, आपल्या आठवणी निवेदन करतात.)

मी धंद्यानिमित्त कोल्हापूरला पुष्कळ वर्षे, पुष्कळ वेळा आलो आहे. परंतु मी जेव्हा प्रथमच कोल्हापूरला आलो होतो, त्यावेळी तेथील वकील बंधूची काहीच माहिती मला नव्हती. तसेच कोल्हापूर हे पूर्वीचे संस्थान असलेमुळे, पुण्याबद्दलच्या वृथा घमेंडीने म्हणा, अगर अन्य कारणामुळे म्हणा कोल्हापूरचा वकील वर्ग अत्यंत सामान्य असणार असा दूषित पूर्वग्रह घेऊनच मी आलो होतो ! परंतु त्यावेळी व त्यानंतरही अनेक वकील मित्रांचा परिचय झाला, अनेकांचे बरोबर काम करण्याची संधी मिळाली. काहींच्या बरोबर चर्चा करण्याची संधी मिळाली, काहीना प्रत्यक्ष कोर्टात काम करताना पाहिले आणि अत्यंत मनापासून मी नमूद करू इच्छितो की माझे दूषित पूर्वग्रह तर नाहीसे झालेच, परं त्याची जागा आदर व तत्सम भावनानी घेतली. कोल्हापूरचा बार खरोखरच उच्च दर्जाचा आहे. व हेच उद्गार कोल्हापू कोर्टात काम केलेल्या माझ्या अनेक न्यायाधीश मित्रांनी काढलेले आहेत. परंतु याचबरोबर आणखी एका गोष्टीचा उल्लेख मला करावसा वाटतो. कोल्हापूरचा परिसर हा समृद्ध व श्रीमंत आहे. तशीच माणसेही मनाने श्रीमंत बुद्धीने समृद्ध आहेत. आणि माणसाच्या मनाची पकड घे असा गूण म्हणजे " सौजन्य. " मी ज्या ज्या वेळी कोल्हापुरात आलो त्या त्या वेळी वकील बंधूनी मला अत्यं सौजन्याने व प्रेमाने वागविले आहे व ही गोष्ट मी कधी विसरू शकणार नाही.

द. महाराष्ट्रातील दोन शहरे मला फार आवडता कोल्हापूर व सांगली. मोठ्या व निर्मळ मनाची माण तोंडातील भाषा रगेल पण मनाची भाषा गोड पकड घेणारी

न्यायदान हे अत्यंत पवित्र कार्य आहे. न्यायदानावरी जनतेचा विश्वास उडाला तर देशाचा आत्माच नाहीसा झा असे आहे. आणि न्यायदानाचे कामात वकील वर्गाचा फा मोठा वाटा आहे. वकिलवर्गच न्यायदानाची घटना असतो. प्रामाणिक व कुशल वकिलवर्ग ज्या जिल्ह्या लाभलेला आहे तो भाग्यवान आहे आणि म्हणूनच कोल्हा पूरच्या वकिलवर्गाबद्दल माझ्या भावना व्यक्त करून व त्यां योगे भाग्यवान जिल्हा म्हणून कोल्हापूरकरांचे अभिनं करून या मंगल प्रसंगी आपण आपली उज्ज्वल परंपरा काय राखा अशी वकिलवर्गाला विनंती करून शुभेच्छा करतो.

**–अॅ. वसंतराव देशमु**

पुणे

● ● ●

*Our Hearty Felicitations to the Kolhapur Judiciary on its Centennial Celebrations.*

KOLHAPUR SUGAR MILLS supplies the essential needs of **India's** many major industries—

from Pharmaceuticals to Paints, Plastics to Textiles, Paper to Leather and Rubber.

Processed in modern plants, all KSM products meet the highest specifications, and the quality of each is guaranteed by the manufacturers, which is a unique feature in the field.

One of the largest manufacturers of Crystal Sugar and Industrial Alcohol in Maharashtra,

**KOLHAPUR SUGAR MILLS** is also the only manufacturer of Power Alcohol in this State.

Besides, **KOLHAPUR SUGAR MILLS** manufactures Ground nut oil and a range of vital process Chemicals which include: Acetic Acid, Butyl Acetate, Butyl Alcohol, Acetaldehyde, Crotonaldehyde and Ethyl Acetate.

**THE KOLHAPUR SUGAR MILLS LTD.**

KASABA BAVADA, **KOLHAPUR – 3.**

## ८

( **श्री. तुकाराम रामचंद्र कुलकर्णी** हे आमच्या बारमधून प्रथम असि. जज् म्हणून नेमले गेले व आता ते डिस्ट्रिक्ट जज् आहेत. ते आपल्या आठवणी कथन करतात : )

" वकील मंडळींनी एखादा नाटच प्रयोग बसवून त्याचे उत्पन्न Legal Aid Society ला द्यावे असा एकदा बूट निघाला. नाटकप्रेमी जी. आर. हळदीकर वकील उत्साहानें पुढे सरसावले व काही दिवस प्रायव्हेट हायस्कूलच्या जुन्या इमारतीत " संशय कल्लोळ " च्या तालमीही सुरू झाल्या. त्यात मजकडे फाल्गुनरावची भूमिका योजण्यात आली होती. परंतु काही दिवसानी ' संशय कल्लोळ ' च्या या तालमी बंद पडल्या.

पुढे ' एकच प्याला ' नाटक करावयाचे ठरले व त्याच्या तालमी जुन्या राजवाडयातील वकिलांच्या खोलीत सुरू झाल्या. सिंधूच्या बापाची भूमिका करण्यासाठीं वयोवृद्ध कृ. दा. माने पुढे सरसावले. त्यांची भूमिका अल्पशी होती व सारे दीड वाक्य त्यांच्या वाटणीला आले होते. पण ते दररोज न चुकता तालमीस हजर असत. मुख्य प्रयोगाच्या वेळी त्यांचा 'करुणरस' ( अमृतांजनची बाटली ) स्टेजवर पडली. त्याबद्दलचा विनोद मासिकात प्रसिद्धी पावला असून त्याला वाङमयात कायमचे स्थान मिळाले आहे.

मजकडे या नाटकात रामलालची भूमिका होती. एका प्रवेशात रामलाल शरदच्या पाठीवर हात ठेवताच विकार-वश होतो असा प्रसंग आहे. या प्रयोगानंतर पुढें बरेच दिवस आमचे घरी ' संशय कल्लोळ ' नाटकाची पुनरावृत्ति होत राहिली. नाटच-प्रयोगाचे उत्पन्नही बरेच झाले व खर्च वेंच वजा जाता बरीच रक्कम Legal Aid Society ला देण्यात आली.

# कवि बाबूराव टिळक आज असते तर

या सोहाळयाच्या प्रसंगी आमच्या अनेक दिवंगत सहकाऱ्यांची आठवण आम्हास होत आहे. त्यात रघुनाथ बळवंत उर्फ बाबूराव टिळक वकील यांची अनुपस्थिती काही वेगळचा कारणाने विशेष जाणवते. कारण ते हयात होते तोपर्यंत असा वकिलांचा एकही मेळावा झाला नाही की जेव्हा बाबूरावांच्या काव्याचा आस्वाद आम्ही घेतला नाही.

बाबूरावांचा काव्यप्रकार लक्षात घेता आस्वाद हा शद्व खरा समर्पक नाही. कारण त्यांच्या काव्यात तसा हळूवारपणा, शद्वलालित्य, कल्पनेच्या पोकळ भराऱ्या, भावनाविष्कार असला काहीही प्रकार नसायचा. उलट अगदी वस्तुनिष्ट, देशीपरदेशी शद्वांचे मिश्रण करून, व्यंगात्मक आणि उपहासात्मक पद्धतीने केलेला तो सरळ हल्ला असायचा. एका काव्यपंक्तीत, नव्हे एकदोन शद्वातही, एखादी व्यक्ति साफ व्हावी अशी त्याला ताकद असे. अशी काव्यं बाबूराव स्वतःच गाऊन, प्रसंगी अंगविक्षेप करून, त्याला मल्लीनाथीची जोड देऊन, अशी काही मैफिल रंगवीत की ते ऐकताना आमची हसून हसून मुरकुंडी वळायची आणि झालेलं जेवण कुठल्याकुठं साफ जिरून जायचं.

दुर्दैवानं हे काव्य त्यानी लिहून ठेवलेलं नाही. नाही तेच बरोबर झालं. कारण न जाणो उपहासलेली एखादी व्यक्ति आपली अब्रू गेली म्हणून तक्रार करायची. प्रत्यक्षात तसं कधी घडलं नाही. कारण तक्रार करावी तर तक्रार करणाऱ्याचीच फजिती अधिक जाहीर व्हावी असा तो मर्मभेदी पण अगदी सत्याधिष्टित प्रकार असायचा.

आम्हाला त्यापैकी फारच थोडचा आणि त्या सुद्धा विखुरलेल्या अशा काव्यपंक्ती आठवतात. त्यावरून बाबूरावांच्या काव्याची शक्ति अगर काव्याचे सम्यक् दर्शन होणार नाही याची आम्हास जाणीव आहे. तथापि वानगीदाखल काही थोडा परिचय आम्ही करायचा प्रयत्न करीत आहोत.

प्रथमतः त्यांच्या शद्वरचनेचं वैशिष्ठच पाहू.

दुसऱ्या बाजूचा वकील नाही असं पाहून चेंबरमध्ये हळूच जाऊन कोर्टाला एकतर्फी हकीगत सुनवायची अशी जी काहीना खोड असते त्याचं वर्णन कवीनं **' एक्सपार्टीचापल्य '** अशा चपखल शद्वसमूहात केलं आहे. आरोपीवर काहीतरी करून गुन्हा शाबीत व्हावाच अशी धडपड करणाऱ्या सरकारी वकीलाला ' हा प्रॉसीक्यूटर परसीक्युटर्वा ' अशा शेलक्या शद्वाने त्यानी आहेर दिला. अशा प्रॉसीक्युटरमुळे पुष्कळ फाशी जातात व यमाच्या राज्यात भर पडते तेव्हा त्याला **' यमराजवंद्य '** असे संबोधले.

काव्याकरता कवीने गमतीदार प्रसंग शोधून काढले होते. उदा. एक प्रसंग असा कल्पिला की एक पक्षकार कोल्हापुरात वकील कोण द्यावा अशा विवंचनेत असतो. त्याला एका मध्यस्थाची गाठ पडते व तो मध्यस्थ त्याला बाररूमकडे घेऊन जातो आणि त्याला एकेक वकीलांचे गुणवैशिष्टच वर्णन करतो. या काव्याला त्यानी ' स्वयंवर ' असे समर्पक नाव (रघुवंशातील इंदुमति स्वयंवराच्या धर्तीवर) दिलं आहे. कारण मध्यस्थ सांगत असतो की तुझं जर मुलकी कोर्टात काम असेल तर हा अमुक वकील वर. तसंच जर अमुक कोर्टाकडे काम असेल तर तमुक वकीलाची कास धर. नमुना म्हणून खालील काव्यपंक्ती पहा.

आकार लाला वरि शंकराला ।
दाभोळकराला विनिवृत्त बेंचे ॥

म्हणजे तुला पहिल्या बेंच कोर्टाचा अभिप्राय बदलून दुसऱ्या बेंचाकडे फेर विचारार्थ काम पाठवायला हवे असेल तर शंकरराव दाभोळकरांच्या गळयात माळ घाल, कारण ती त्यांची स्पेशॅलिटी आहे. 'आकार लाला' या शब्दानी दाभोळकरांच्या गरगरीत देहयष्टीचाही निर्देश कवीनी केला आहे. अशाच एका संदर्भात त्यानी रचलेली खालील ओळ पहा.

कळेकरू लेकरु चौगुल्यांचे ।

म्हणजे 'एरव्ही जे कडक स्वभावाचे चौगुले कोर्ट आहे त्यांच्यापुढे कळेकर वकील गेले तर ते थोडे नरमपणे वागतील कारण त्यांचा तो थोडा 'soft corner' आहे' इतका सगळा अर्थ एका 'लेकरू' या समर्थ शब्दाने कवीने साधला आहे.

दुर्धर्षितामर्ष वाक् सन्निकर्षी ।
हर्षे विनावश्यक क्रॉसकर्षी ॥

अशा शब्दानी श्री. हर्षे वकिलांचे शारीरिक वर्णन व लांबलचक क्रॉस करणारे हे त्यांचे त्यावेळचे व्यंगहि दर्शविले आहे.

आपलं फौजदारी प्रॅक्टिस येनकेन प्रकारेण चालावं अशी धडपड करणाऱ्या व स्वतःच पक्षकाराकडे जाणाऱ्या एका ज्युनियर वकीलाला उद्देशून कवि म्हणतात,

स्वयं शरण्यः शरणोन्मुखानाम् ।
चोरी दरोडा खुन रेप कारिणाम् ॥
सदैव आरोपित पक्षपाती ।
यथार्थ नामा खलु फॉर्टीवाला ॥

यातील 'फॉर्टीवाला' या शब्दाने सेशन्स केसचा दर अवघ्या चाळीस रुपयावर आणणारा– नव्हे क्वचित् केवळ नुसत्या चहाच्या कपावर ( फॉर-टी-वाला ) सुद्धा काम चालविण्यास तयार होणारा अशी द्व्यर्थी टीका कवीला करावयाची आहे.

का न दामुअण्णा मृदु मंजुवचना ।
कामणद्युम्ना वरिसी सकाना ॥

या काव्यपंक्तीत श्री. दामूअण्णा रानडे या वकीलांचे तरुणपणीचे सौंदर्य वर्णन झालेले आहे. त्यातील पहिला 'कान' म्हणजे 'का ? न' का नाही अशा अर्थाने व दुसरा 'सकाना' हा शब्द म्हणजे त्यांचे वडील बंधू बंडूनाना हे किवंडे आहेत पण हा किवंडा नाही 'सकाना' आहे अशा अर्थाने वापरला आहे.

आपल्या सीनियर वकिलांचा पोषाक, ढब वगैरेबाबत जो अनुकरण करून आपण जणू त्या सीनियर वकीलासारखाच आहे असा जो भासवतो त्याला अखेर कवीनं म्हटलं की,

शार्दूलचर्मावृत भल्लुको यथा ।

या रीतीनं बऱ्याच लोकांचं वर्णन करून अखेर सकल-गुण संपन्न, अशा एका वकीलातील 'कौस्तुभमणी' अशाच्या गळयात त्या पक्षकारानं माळ घातली असा शेवट कवीनं केला आहे.

दुसरी एक कल्पना अशी की कामातील तक्रारी होऊन काम ठरावावर बरेच दिवस पडले, ठराव बाहेर येईना तेव्हा निर्माण होणाऱ्या अनेक शंका कुशंका 'संशय रत्नमाला' या नावच्या काव्यात ( कवि मोरोपंतांच्या धर्तीवर ) कवीनी प्रदर्शित केल्या आहेत.

का देवी रिपुसाठी करी रदबदलीस मग गळे शस्त्र ।
पूज्यं ते खलु नार्यः यत्र रमंतेहि देवता तत्र ॥
( येथे रिपु म्हणजे विरुद्ध पक्षकार असा अर्थ. )

त्यातील पुढील थोडया ओळी पहा.

का कुणी मानकरी करी वर पाठपुरावा करीतसे अरिचा ।
मीनाशी वैर वृथा कोण करिल सांग सागरीचा ॥

का कुणी कुत्तेवान अथवा पैलवान ड्रायव्हर वा ।
प्रभुगृही करि घरी आडवा कोण भी न श्वा-नर-वा ॥

( तिसऱ्या ओळीतील टीकेचा रोख त्यावेळच्या महाराजांच्या खाजगी मर्जीतील मंडळीवर आहे हे लक्षात येईलच. )

यापुढे जे संशय प्रदर्शित केले आहेत ते व्यक्तिगत आहेत म्हणून आम्ही देत नाही. पण ते फार खोचक होते एवढे आम्ही सांगू शकतो.

कुणावर आरती, कुणावर भूपाळी, कुणावर कटाक्ष, कुणावर छेकापन्हृति या काव्यालंकाराचा प्रयोग असे अने विविध प्रकार कवीनं उपयोगात आणले होते. ती काव्यं एका पेक्षा एक रंगतदार आहेत. पण त्यातील व्यक्तीगत क उल्लेखामुळं त्याची अवतरणे देणं आम्हास प्रशस्त वाटत नाही

टिळकांचा मुख्य रोख वशिलेबाजीवर टीका करणं होता. आणि त्याची विविध अंगं दर्शविण्यासाठीच त्यानी अ कतर काव्यं लिहिली. पण यावरून असा वाचकांचा गैरसमज व्हावा की वशिलेबाजी ही त्यावेळच्या कोल्हापूरच्याच कोर्टा फक्त वैशिष्टच होते. दुर्दैवानं ही परिस्थिति कोल्हापुरातच पण इतर सर्वच ठिकाणी या ना त्या रूपात आणि अपवादा अशा व्यक्तीपुरती पूर्वी होती व आजही आहे. न्यायदा अपवादात्मकरीत्या असलेला हा कलंक साफ नष्ट करा कायदा असमर्थ आहे हे आपण पाहतोच. म्हणून टिळकां सारखी उपहासाची शस्त्रं जर ठिकठिकाणी संबंधिता उपसली गेली तर त्या अनिष्ट प्रवृत्तीला परिणाम आळा बसेल हा विचार मनात येतो. आणि म्हणून वाटतं बाबूराव टिळक आज असते तर ! ...

## रुचिपालट

# जहागिरीतील पहिला सेशन्स खटला

फारा वर्षापूर्वीची गोष्ट. त्यावेळी जहागिरदाराना सेशन्सचे अधिकार नव्हते. त्यानी ते दरबारशी झगडा करून एकदाचे मिळविले. अधिकार मिळाले खरे परंतु एका जहागिरीचे 'दुर्दैव' असं की अधिकार मिळून वर्ष होत आलं पण मोठा गुन्हाच घडेना. अधिकार काढून घेतले जातात की काय अशी भीति निर्माण झाली.

पण थोड्याच दिवसात खून म्हणता येईल असा गुन्हा जहागिरीतल्या एका गावी एकदाचा झाला. तो होताच त्या गावात खळबळ उडाली. कारण खून हा प्रकार त्या गावाला माहितच नव्हता. सगळं गाव देवीपुढं जमलं. देवीला कौल लावला. एकाच्या अंगात संचार झाला आणि त्यानं नेमका आरोपीचा हात धरला. आरोपी भेदरला कारण 'देवानंच' हात धरला होता. तेव्हा त्यानं आपल्या तोंडानं सर्व काही कबूल केलं. त्याला मग कोंडून ठेवला. शिक्षाही करून टाकावी असं काही गावकरी म्हणू लागले; पण पोलीसपाटील आडवा आला आणि म्हणाला, मला वर 'रपोट' केला पाहिजे.

पुढं फौजदार गावी आले. तपासाचा सोहाळा झाला. वास्तविक काही व्हायचं उरलंच नव्हतं. मॅजिस्ट्रेटपुढं कबुली जबाब झाला. खटला सेशन्सकमिट झाला.

ज्या दिवशी सेशन्स चालणार होतं त्या दिवशी गावात कोण खळबळ! एकतर सेशन्स खटला हा काय प्रकार याचं कुतूहल आणि दुसरं असं की खुद्द 'सरकार' काम चालवायला बसणार होते. बसायलाच हवं. कारण अधिकार व्यक्तीगत होते. म्हणून कोर्टात गर्दी जमली. सरकारी वकील नेमले. तसंच आरोपीलाही सरकारतर्फेच वकील दिले गेले. पण अडचण अशी आली की आरोपी गुन्हा 'नाकबूल' करायला तयार होईना. तो म्हणायला लागला की मला देवानंच धरलं आहे. 'मी देवापुढं कसं खोटं सांगू.' अडचण मोठीच. कारण आरोपीनं गुन्हा कबूलच केला तर सेशन्स खटला रंगतीनं चालणार कसा? कबुलीवरून दिलेल्या निकालात स्वारस्य काय? आणि शिवाय सरकारी व आरोपीच्या वकिलांचे 'दिवस' कसे लागू होणार? कारण दर दिवसाला मेहनताना मिळायचा होता.

मग सगळे खटपटीला लागले. जो फौजदार एरव्ही गुन्हा कबूल करायला लावायला आरोपीवर दमदाटी करतो तो फौजदारही आरोपीपुढं गयावया करू लागला आणि सारे आरोपीला म्हणू लागले की, 'बाबारे, गुन्हा नाकबूल कर.' पण आरोपी ते शब्द उच्चारायला तयार होईना. कसा उच्चारणार? त्याला देवाची भीति होती. अखेर तडजोड ठरली की आरोपीनं नुसतं स्वस्थच बसायचं. गुन्हा कबूलही म्हणायचं नाही किंवा नाकबूलही म्हणायचं नाही. आणि मग त्याचा अर्थ गुन्हा नाकबूल असा लावून खटला रीतसर चालवायचा.

या सर्व प्रयासात दोन तास गेले. पण त्यानं काही बिघडणार नव्हतं. जहागीरदार हे कामाला चार वाजताच बसणार होते. आन्हिक, भोजन, वामकुक्षी हे सर्व आटोपायला एवढा वेळ कमीत कमी लागणारच होता. म्हणून रोज चारनंतर खटला उभा राहायचा आणि जेमतेम घडी दीड घडी कामकाज चाललं की काम बंद व्हायचं. कारण स्वारींची फिरायला जायची वेळ व्हायची. या वेळातही जे काम चाले ते कसं शांतपणे, मंदचालीने आणि गांभीर्यानें. कारण खुद्द सरकार स्वारी बसलेली होती. मग तिथं गडबड कशी चालणार. सारं काही आस्तेकदम आणि आदबीनं. एखादा विचारलेला प्रश्न साक्षीदाराला समजायचा; पण कोर्टाच्या तो लक्षात यायचा नाही. मग श्रीमंत पृच्छा करीत की 'हे काय चाललंय?' आणि मग त्यांचे सल्लागार सेक्रेटरी त्या प्रश्नाचा आशय संपूर्णपणे श्रीमंताना समजून सांगत. मग पुढील प्रश्न विचारायला इषारा मिळे. अशातऱ्हेनं काम चालल्यावर एरव्ही जे सेशन्स दोन दिवसात संपलं असतं त्याला तब्बल आठ-दहा दिवस लागले असल्यास नवल नाही. आणि ही गोष्ट दोन्ही बाजूच्या वकिलांच्या किती पथ्यावर होती बरं! राहून राहून वाटतं की सेशन्स चालावीत तर अशी चालावीत. नाहीतर……

"Why don't you settle the case out of the Court?" said an Irish Judge to the litigants before him.

"Sure, that's what we were doin' My Lord, when the police came and interferred."

# महोत्सवास आलेले शुभ संदेश

आमच्या शतसांवत्सरिक सोहाळघास शुभेच्छा इच्छिणारे अनेक संदेश व पत्रे आली. सगळ्यानी आमच्या न्यायालयीन परंपरेबद्दल धन्योद्गार काढले व आमच्या उत्सवास सुयश चिंतिले. पुनरुच्चार टाळण्यासाठी व स्थलाभावामुळें संदेशातील मजकूर न देता संदेश पाठविणाऱ्यांपैकी कांही विशेष व्यक्तींचा नामनिर्देश आम्ही करीत आहोत.

१. ना. झकीर हुसेन, राष्ट्रपति, नवी दिल्ली
२. श्रीमती इंदिरा गांधी, पंतप्रधान ,,
३. ना. व्ही. व्ही. गिरी, उपराष्ट्रपति ,,
४. ना. मोरारजी देसाई, उप-पंतप्रधान ,,
५. ना. यशवंतराव चव्हाण, गृहमंत्री ,,
६. ना. पी. गोविंद मेनन, कायदा मंत्री ,,
७. श्री. सी. के. दफ्तरी, अॅटर्नी जनरल ,,
८. ना. व्ही. पी. चेरियन, गव्हर्नर, मुंबई
९. ना. व्ही. पी. नाईक, मुख्यमंत्री, ,,
१०. ना. बाळासाहेब देसाई, महसूल मंत्री, ,,
११. ना. एस्. के. वानखेडे, कायदा मंत्री, ,,
१२. न्या. व्ही. ए. नाईक, इंडस्ट्रियल कोर्ट, ,,
१३. न्या. एन्. पी. नथवाणी, हायकोर्ट जज्, ,,
१४. श्री. पी. एस्. मालवणकर, रजिस्ट्रार हायकोर्ट ,,
१५. न्या. व्ही. बी. राजू, गुजराथ हायकोर्ट जज्, अहमदाबाद
१६. श्री. आर. के. जोशी, डिस्ट्रिक्ट जज्, पुणे
१७. ,, व्ही. जी. जमखिंडी, अॅडव्होकेट, धारवाड
१८. ,, एन्. बी. नाईक, डिस्ट्रिक्ट जज्, सांगली
१९. ,, व्ही. जी. सरनाईक, प्रेसी. मॅजि. मुंबई
२०. ,, डी. एम्. वाघ, स्मॉ. कॉ. जज्. मुंबई
२१. ,, एस्. व्ही. गुप्ते, अॅडव्होकेट, सुप्रीम कोर्ट, दिल्ली
२२. ,, बी. एन्. लोकूर, लॉ सेक्रेटरी, दिल्ली
२३. ,, आर. के. रानडे, सेल्स टॅक्स ट्रिब्यूनल, मुंबई
२४. ,, वसंतराव देशमुख, अॅडव्होकेट, पुणे
२५. श्री. वसंत शांताराम देसाई, अॅडव्होकेट, पुणे
२६. ,, वाय्. एन्. लेले ,, बेळगांव

याशिवाय खालील बार असोशिएशन्सचे पदाधिकारी यांचेकडून संदेश आले आहेत.

पुणे, सातारा, सांगली, बेळगांव, औरंगाबाद, परभणी, बिद्री, वर्धा, धुळे, अकोला, अहमदनगर, जळगाव, गोवा.

आम्ही सर्वांचे आभारी आहोत.

---

# आमचे देणगीदार

या महोत्सवाचा आर्थिक भार प्रथमतः आमच्या सभासदानी व स्नेहसम्मेलनात भाग घेणाऱ्यानी उचलला. त्यानी ठराविक वर्गणी दिलीच शिवाय काहीनी आपणहून वर्गणीपेक्षाहि अधिक रक्कम दिली व जरूर तर अधिक रक्कम देण्याचे आश्वासन दिले. काहीनी आपल्या मोटारगाड्या येथे व परगाव करता वापरण्यास दिल्या. पण हे करणे उस्फूर्त आणि एकतन्हेने कर्तव्यबुद्धीनेच केले गेल्याने आमच्या संबंधित वकिलांची नामावली देणे प्रशस्त वाटत नाही. पण आमचे सभासद नसताही ज्या तिऱ्हाइतानी व पाहुण्यानी आम्हास आर्थिक मदत केली त्यांचा नामनिर्देश करणे हे आमचे कर्तव्य आहे म्हणून वर्गवारीने त्यांची नावे खाली देत आहे.

## (अभीष्टचिंतनपर जाहिराती देऊन खालील संस्थांनी मदत केली.)

१००० धी डेक्कन को. स्पिनिंग मिल्स लि., इचलकरंजी
७५० धी कोल्हापूर शुगर मिल्स लि., कोल्हापूर
५०० कुंभी कासारी साखर कारखाना लि. कुडित्रे
५०० भोगावती स. साखर कारखाना लि. शाहूनगर
५०० दूधगंगा वेदगंगा स. साखर कारखाना लि. बिद्री
५०० पंचगंगा स. साखर कारखाना लि. गंगानगर
५०० श्री. गोविंदराव कोरगावकर धर्मादाय संस्था, कोल्हापूर
५०० शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर
५०० शेतकरी विणकारी सहकारी संघ लि., इचलकरंजी
५०० धी डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-बँक लि. कोल्हापूर
५०० पीपल्स को. बँक लि. इचलकरंजी
३०० धी महावीर को. बँक लि., कोल्हापूर
३०० मेसर्स घाटगे पाटील ट्रॅन्स्पोर्ट कंपनी, कोल्हापूर
३०० श्री महालक्ष्मी को. बँक लि. कोल्हापूर
३०० शेती उत्पादन बाजार समिती, कोल्हापूर

## (खालील व्यक्तीनी देणग्या दिल्या)

२०१ मे. शेलाजी वनाजी फर्म, गुजरी, कोल्हापूर
१०१ मे. मणिलाल भिकाभाई परीख, शाहूपुरी
१०१ मे. नगीनदास मंछाराम शहा, ,,
१०१ मे. दामोदर शिवराम आणि कं. ,,
१०१ मे. डाह्याभाई भाईचंद आणि कं. ,,
१०१ मे. कासमअल्ली तयबली भोरी अँड ब्रदर्स, शाहूपुरी
१०१ मे. मोतीभाई एस्. दोशी, शाहूपुरी
१०१ मे. ए. जी. बागवडे, ,,
१०१ मे. शा. ठाकरसी देवशी आणि कं. ,,

## (परस्थ वकिलांच्या देणग्या)

१०१ श्री. रामराव आदिक मुंबई
१०१ ,, एम्. व्ही. परांजपे ,,
१०१ ,, आर्. जी. सामंत ,,
१०१ ,, एस्. बी. भस्मे ,,
१०१ ,, के. जे. अभ्यंकर ,,
१०१ ,, एन्. एस्. श्रीखंडे ,,
१०१ ,, पी. टी. पाटील ,,
१०० ,, वाय्. एन्. लेले बेळगांव

याखेरीज कमी रकमा काहीनी दिल्या आहेत. त्यांचा उल्लेख विस्तारभयास्तव केला नाही.

या सर्व देणगीदारांची महोत्सव समिती अत्यंत ऋणी आहे.

## कोल्हापूर जिल्हा न्यायालयाच्या शतसांवत्सरिक सोहाळ्याचे

# ★ सौरभ – पराग ★

संकलक : **मा. कृ. ताम्हनकर**

( परिचय पृष्ठ १६ पहा )

**मं**गळवार दि. ३० एप्रिल १९६८, तिथी अक्षय्य-तृतीया– साडेतीन मुहूर्तापैकी एक सौभाग्य-दिन खराच. पण कोल्हापूर जिल्हा न्यायालयाच्या इतिहासात, ज्याची नोंद सुवर्णाक्षरानी करावी असा भाग्यशाली उगवला. जिल्हा न्यायालयाची रीतसर प्रतिष्ठापना होऊन 'शंभर वर्षे' पूर्ण झाल्याने कृतकृतार्थ भावनेने 'शतसांवत्सरिक महोत्सव' या दिवशी थाटाऐटीने साजरा झाला; याचे आगळे महत्त्व जाणून, जिल्ह्यातील न्यायालयातील निगडीत व्यक्तींना भाग घेणे सुकर व्हावे यासाठी 'कोर्टाच्या सुट्टीचा दिवस' म्हणून मुद्दाम जाहीर करण्यात आला.

समारंभाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश न्या. **एस्. पी. कोतवाल** यांची नियुक्ती झाली होती. 'पंच पंच प्रभात समयी', राजधानी मुंबई येथून आकाशयानातून ते सोहाळ्यास येण्यासाठी निघाले. त्यांचे सहप्रवासी म्हणून आमच्याच बारमधून न्यायखात्यात निवडलेले व आता महाराष्ट्र हायकोर्टातील न्यायमूर्तीपदावर अधिष्ठित झालेले न्या. **एम्. एस्. आपटे** होते; तसेच मुंबई बारचे श्री. एम्. व्ही. परांजपे (एकेवेळचे महाराष्ट्र हायकोर्टाचे न्यायमूर्ति), श्री. एन्. एस्. श्रीखंडे (निवृत्त जिल्हा न्यायाधीश) हेही सहप्रवासी होते.

बेळगांवच्या विमानतळावर विमान नियमित वेळेस उतरले. आधीच सादर स्वागतासाठी आमच्या बार असोशिएशनचे अध्यक्ष श्री. बाबूराव जोशी, चिटणीस श्री. डी. एम्. दोशी, समवेत कोल्हापूर जिल्हा न्यायाधीश श्री. कर्णिक, असि. जजिस् श्री. साळवी व श्री. नांदे होते; त्याशिवाय खुद्द बेळगांव बारचे अध्यक्ष श्री. कित्तूर आणि वयोवृद्ध अॅडव्होकेट श्री. यशवंतराव लेले हेही सौहार्द भावनेने स्वागतास उपस्थित होते.


पुढील कोल्हापूरच्या प्रवासमार्गात कागलच्या सीमेवर कागल नगरपालिकेच्या अध्यक्षांनी सन्माननीय पाहुण्यांना हार घालून स्वागत केले. त्याचप्रमाणे 'कागल हायस्कूलच्या' मुख्याध्यापकांनी स्वागत केले. कागल बार असोसिएशनच्या वतीने कागल अधिपतींच्या माळावरील प्रासादांतील भव्य दिवाणखान्यात, स्वागतसमारंभ विशेष आगत्यानें पार पडला. न्या. एम्. एस्. आपटे व अॅडव्होकेट एम्. व्ही. परांजपे हे मूळ कागलचे रहिवासी. म्हणून त्या समारंभात औचित्य होते.

कोल्हापुरात पाहुण्यांचा मुक्काम 'सर्कीट हाऊस' वर योजिला होता. दुपारी १२ चे सुमारास आगमन झाले. आमचे उपाध्यक्ष श्री. रंगराव चौगुले हे सामोरे जाऊन पाहुण्यांचे प्रथम स्वागत करते झाले. त्यावेळीं कोल्हापूरचे नगराध्यक्ष, जिल्हाधिकारी आदि डिस्ट्रिक्ट ऑफिसर्स आणि बारचे प्रमुख सभासद यांची ओळखदेख करून देणेत आली.

दोनप्रहरी जिल्हा न्यायाधिशानी आपल्या निवासात पाहुण्यांना थाटाची मेजवानी दिली; काही माननीय निमंत्रीत पंगतीस होते.

* * *

जिल्हा न्यायालयाकडे सन्माननीय पाहुण्यांचे शुभागमन ठीक दु. ४ वाजतां झाले. सर्व परिसर रंगीबेरंगी पताका, फलारे, तोरणे, पल्लव, कमानीनी सुशोभित करणेत आला होता. ' न्यायालयाची वास्तू ' विजेच्या रोषणाईनें मंडित केली होती. जिल्हयांतील सर्व न्यायाधीश, समस्त वकीलवर्ग त्याचप्रमाणें मुंबई, पुणें, सांगली, सातारा, सोलापूर, विजापूर इत्यादि ठिकाणाहून वकील, न्यायाधीश असेही आपुलकीने उपस्थित होते; त्याचप्रमाणे जिल्हयांतील न्यायखात्यांतील कर्मचारीही उपस्थित होते. अशा शानदार आदरतेने व गोड गजबजीने सन्माननीय पाहुण्यांचे स्वागत झाले.



कोर्टहॉल मधील जमलेल्या प्रेक्षकांचे एक दृश्य

नंतर प्रथमतः बाररुममध्ये सर्व वकिलमंडळीसमवेत पाहुण्यांनी चहापान केले. याचवेळी पाहुण्यांनी व्यक्तिशः वकिल–मंडळीची ओळख स्नेहपूर्ण हस्तांदोलनाने करून घेतली. एक आगळ्या जिव्हाळयानें वातावरण भारले गेले. या सोहाळयाचे निमित्ताने श्री. हेब्बाळकर अॅड. यांनी ' न्यायमनोरा ' या जलरंगातील काढलेल्या चित्राचे पाहुण्यांनी कौतुक केले.

*

अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्यासमवेत मुख्य पाहुण्याना होणारा हा आनंद केवळ चहापानाचा नसावा.

*



दुपारी ४–३० वाजतां न्यायालयाच्या प्रमुख वास्तू–दिवाणखान्यांत, या जिल्हयाचे पहिले जिल्हा न्यायाधीश कै. **न्या. महादेव गोविंद रानडे** यांच्या रंगीत तैलचित्राचा अनावरण समारंभ ठरला होता. कोल्हापूरचे भारत-विख्यात चित्रकार श्री. रविंद्र मेस्त्री यांनी आत्मीयतेने चित्रात ' प्राण ' जणू भरला होता. बारचे अध्यक्ष श्री. बाबूराव जोशी यांनी भारलेल्या अर्थघन शद्वात अनावरणाचे औचित्य व मागील थोर परंपरा सांगितली, त्यामधून न्या. रानडे यांचे उचित गुणस्तवन होते. सन्माननीय पाहुणे, मुख्य न्यायाधीश श्री. एस्. पी. कोतवाल यांनी न्या. रानडे यांच्या रंगीत तैलचित्राचे अनावरण टाळयांच्या गजरांत केले; आणि आपल्या समयोचित भाषणात, न्या. रानडे यांच्या कायद्याच्या अचूक अर्थवाहकत्वाची व न्यायनिःस्पृहतेची महती गाईली; ती उज्वल परंपरा तेवत ठेवणेची आतां सर्वांवरच जबाबदारी आहे आणि यामुळे एवंगुणविशिष्टत्व लाभल्याचे धन्योद्गार काढले. सहचिटणीस श्री. ए. सी. शहा यांनी समर्पक आभार मानले.

नंतर माननीय प्रमुख पाहुणे यांचेसमवेत समस्त वकीलवर्ग आणि प्रमुख न्यायमूर्ति पाहुणे व न्यायाधीश मंडळी अशी दोन समूह छायाचित्रे घेणेत आली; यांतही विशेषत्व हे की

या दुसऱ्या छायाचित्रात न्यायालयीन सर्व कर्मचारी व वकिलांचेही कारकून यांचा जिव्हाळयाचा समावेश झालेला होता; आमच्या न्यायालयीन महोत्सव वा संमेलन यातील हा अेक अभूतपूर्व योगच म्हणावा लागेल.

* * *

सायंकाळी ठीक ६ वाजता, 'केशवराव भोसले' या दरबारी वैभवशाली नाटचगृहात शतसांवत्सरिक महोत्सवाचा आयतन महत्वाचा असा जाहीर कार्यक्रम नियोजित झाला होता. विशाल व सुखद बैठकीचे सभागृह निमंत्रित प्रेक्षकवृंदांनी फुलून गेले होते. इष्टवेळी मखमली पडदा झुळझुळत सरकला. झगमगत्या प्रकाशाने व्यासपीठ उजळले होते. पार्श्वभूमि म्हणून प्रति-कात्मक न्यायदेवता– दृष्टी झाकलेली व हातात समतोल तराजू आणि शासनी–तरवार, इची रंगीत जीवनाकृति, विलसत होती. तात्काळ श्रोतृवृंदमानस वेगळचा पवित्र वातावरणाशी संवादी झाले. माननीय मंडळी व सन्माननीय प्रमुख न्यायमूर्ति शुभस्वस्थानी विराजमान झाले होते. इष्टापेक्षांचे क्षण सरकत होते. तोच भावमधुर स्वागतगीताच्या सुरेल स्वरांनी वातावरण सुगंधी झाले. आमच्या बार असोशिएशनचे अध्यक्ष श्री. बाबूराव जोशी यांनी प्रमुदित अंतःकरणाने जाण-कारी शद्वांत उपस्थितांचे हार्दिक सुस्वागत केले व आपल्या भाषणात स्थलस्पर्शी अशा न्याया–लयाच्या वैशिष्ठचपूर्ण घटनांचा धावता आढावा घेतला. न्यायालयाची उच्च उज्वल परंपरा ज्या ज्या दिवंगत न्यायाधिशांनी व वकिलानी राखली त्यांच्या थोर निष्ठांचा गौरव-आदर केला. नंतर येथील मुख्य सरकारी वकील श्री. जी. एस्. इंदूलकर यांनी अत्यंत समर्पक शद्वावलीत



तैलचित्राचे उद्‌घाटनप्रसंगी कोर्टहॉल मध्ये भाषण करताना मुख्य पाहुणे.



भोसले नाटचगृहातील प्रेक्षक समुदाय

पाहुण्यांचा वंदनीय परिचय करून दिला. सहचिटणीस श्री. ए. सी. शहा यांनी प्रस्तुत महोत्सव-समारंभास भारत व महाराष्ट्राच्या राजधानीतून न्यायाशी निगडीत अशा थोर व्यक्तींच्याकडून आलेले शुभगौरव संदेश निवेदित केले. नंतर अॅड. डी. एस. खांडेकर यांनी 'संस्थानी कायदे' कसे पुरोगामी होते यांचे थोडक्यात विवेचन केले. महाराष्ट्र बार कौन्सिलचे प्रेसिडेंट अॅड. श्री. रामराव अदिक यांनी मूलग्राही विचार व्यक्त केले. 'अॅडव्होकेटस् अॅक्ट'– १९६१ मुळे वकिलांचे स्थान स्वयंमहत्तेचे अनुषंगिक पवित्र जबाबदारीचे आहे व न्यायगंगा शुद्ध राखण्यात वकिलांची भूमिका निरतिशय महत्वाची आहे, असे प्रतिपादन केले. अॅड. श्री. एम्. व्ही. परांजपे यानीहि आपल्या छोटया वक्तव्यांत वकिलांच्या वैशिष्ठचपूर्ण व जबाबदारीच्या स्थानाचा उहापोह केला.

या महोत्सवाचा चिरकाल लक्षांत राहणारा अेक आगळा समारंभ यावेळी आंखण्यांत आला होता. वयाची 'पंचाहत्तरी' ओलांडलेल्या वकिलांचा, पाहुण्यांच्या शुभहस्ते श्रीफल व महावस्त्र देऊन गौरव करणेत आला. याचे प्रास्ताविक माजी प्राचार्य श्री. एस्. जी. दाभोळकर, अॅडव्होकेट (ओ. एस.) यांनी केले. या गौरवाचे सन्माननीय मानकरी महोदय श्री. आबासाहेब पोतनीस,

श्री. इ. जे. नागावकर, श्री. हरिभाऊ काशीकर, श्री. डी. एस. बन्ने, श्री. कृष्णराव माने, श्री. दत्तात्रय नारायण सरलष्कर, श्री. व्ही. एन्. सबनीस व श्री. अ. चिं. पंडित असे होते.

नंतर न्या. श्री. एम्. एस्. आपटे यांचाहि गौरव श्रीफल व महावस्त्र देऊन करणेत आला. कारण आमच्या बारमधून जाऊन हायकोर्टचे न्यायाधीश पदावर पोचणारे ते पहिले मानकरी होत. उत्तरीचे त्यांचे छोटे भाषण विनम्र स्वीकृतीचे होते.

या महोत्सवी सोहाळ्याची व पूर्वेतिहासाची ग्रंथिका अशी ही जी 'स्मरणिका' प्रकाशित होत आहे त्याच्या अंतरंगीची खुणेची ओळख श्री. डी. डी. वर्धमाने यांनी करून दिली व त्याचे प्रकाशन करावे म्हणून पाहुण्यांना विनंती केली. न्यायमूर्तींनी 'स्मरणिके' च्या वेष्ठनावरील फीत सोडून ती प्रकाशित झाल्याचे घोषित केले.

नंतर अध्यक्षीय भाषणास पाहुणे उभे राहिले. 'स्वातंत्र्यपूर्व' व 'स्वातंत्र्योत्तर' असे दोन स्पष्ट कालखंड दिग्दर्शित करून त्यांनी घटनाधिष्ठित कायद्याचे राज्य, न्यायासने, वकील व नागरिक यांची परस्पर संवर्धक हक्क व कर्तव्यक्षेत्रे कोणती त्याची स्पष्टता केली. न्यायाचे पावित्र्य अबाधित राखण्याची निष्ठा जोपासणे संबंधितांचे आद्य कर्तव्यच. सध्या न्यायदान पद्धतीबद्दल असंतोष व्यक्त करूनच केवळ चालणार नाही. आपआपल्या भूमिकेनुसार यथामति, यथाशक्य सर्वांनीच जिव्हाळ्याची बाब मानणे जरूर आहे. कोल्हापूरच्या न्यायालयाचा एक वेगळा दर्जा आहे व त्याच्या विशेषत्वाची बूज इतरत्र व हायकोर्टातहि मानली जात आहे. कोल्हापूर बार



भोसले नाटचगृहातील प्रेक्षक समुदायाचे दुसरे दृष्य

असोशिएशनचे सदस्य जिल्हा न्यायालयाचा दर्जा पूर्वापार प्रतिष्ठेचा जाणून तसाच पुढेही राखण्याचे महनीय कार्य करतीलच असा आपुलकीचा आशावाद प्रगट करून व धन्यवाद देऊन त्यांनी भाषण पुरे केले.



*

न्या. आपटे उत्तरादाखल भाषण करताना

*

रात्रौ मुख्य पाहुणे व थोडे निमंत्रित यांना शिवाजी विद्यापीठाच्या अलिशान 'अतिथ्य-गृहांत', बार असोशिएशन तर्फे थाटाचा खाना देण्यांत आला.

रात्रौ ११ चे सुमारास, पद्माराजे गर्ल्स हायस्कूलचे प्रशस्त सभागृहात, सौ. किशोरी अमोणकर यांच्या गायनाची मैफिल उत्कट बहारीची झाली. अभिजात गायकी-प्रतिभेचे विलास, त्यांनी-ख्याल, पंजाबी ढंगाची गझल इ. सादर करून श्रोतृवृन्दास मुग्ध केले. बाईंची आवाजी निर्मळ, पल्लेदार व अंत:पिळाची अशी आहे. 'ख्याल'- तयारी व वजन यामुळें 'दिल तूटा' ठरला; त्यांतच लालित्याची मुलायम लवचिकता व सुरेल स्वरलावणीच्या जागा यांनीं काही क्षण 'अलौकिक' केले. त्यांची साथ, शिष्या सौ. माणिक भिडे, (आमचे श्री. श्री. रा. पोतनीस अॅड. यांची सुविद्य कन्या) यांनी सहजसुंदर केली; वाटले - जुगलबंदीचा सत्याभास निर्माण